# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),म. रा. नागपूर यांचे कार्यालय.

**'वन भवन', रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर 440 001.**

**E-mail apccfbpd@gmail.com Phone: 0712-2556785 Fax 0712-2550675**


कक्ष/६

मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन)
15 JUN 2016

क्र.कक्ष-1/रोहयो/मुल्यां/प्र.क्र.10(भाग-1)/14-15/ 520 /16-17
नागपूर 440 001, दिनांक - 14जुन, 2016

विषय:- विविध योजनांतर्गत रोपवन व वनीकरणाबाबत सूचना.

संदर्भ:-1) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा., यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-14/काआ/76/127/92-93/नागपूर दि. 5/8/1994.

2) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/योजना/इए/मवाप्र/95-96 /93/नागपूर दि.13/10/1995.

3) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/इए/मवाप्र/359/सा96-97 /नागपूर दि.27/5/1996.

4) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/योजना/मवाप्र/646/सा 96-97 /नागपूर दि.2/7/1996.

5) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/योजना/इए/मवाप्र692(अ)/ नागपूर दि.5/7/1998.

6) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, (अर्थसंकल्प नियोजन व विकास) म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष1/रोहयो/प्रक्र.10/1469/2014-15 नागपूर दि.6/12/2014.

7) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, (अर्थसंकल्प नियोजन व विकास) म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/रोहया/प्रक्र.10/ 2 / 2014-15 नागपूर दि.1/4/2015.

वरील संदर्भाद्वारे रोपवन कामाबाबत तपशीलवार सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. मुल्यांकन शाखेकडून मुल्यांकन संहितेतील तरतुदीनुसार मुख्यत्वे पुर्वपावसाळी रोपवन कामांचे मुल्यांकन, तृतीय वर्षीय रोपवन कामांचे मुल्यांकन व द्विस्तरीय (10 वर्षीय) रोपवनाचे मुल्यांकन ही कामे नियमित करण्यात येतात. तसेच सदर मुल्यांकना दरम्यान कामात आढळुन आलेल्या त्रुटी अगर उणिवा याबाबतीत आक्षेप नोंदवुन रोपवन कामात सुधारणा सुचविल्या जातात. तथापी रोपवन कामात सुचविण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने आक्षेपांची पुर्तता वेळोवेळी केली जात नाही. सदर बाब कार्यमुल्यांकन लेखापरीक्षणात महालेखाकार नागपूर यांनी नमुद केली आहे. शिवाय मुल्यांकन अहवालाद्वारे यापुर्वी निदर्शनास आणुन दिलेल्या अनेक त्रुटी वारंवार आढळुन येत असल्याने यशस्वी रोपवनाचे प्रमाण कमी झाले आहे. सदर परिस्थितीत सुधारणा होण्याकरिता व रोपवनाच्या मुल्यांकन कामातील अडचणी दुर करण्यासाठी वरील संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचना शिवाय खालीलप्रमाणे अतिरीक्त सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**1) रोपवन क्षेत्रासंबंधी नकाशे तयार करणे:-**

उपचार नकाशात तयार करण्याबाबतीत सविस्तर सुचना वरिल संदर्भीय पत्र क्र.7 अन्वये देण्यात आले आहेत. त्यानुसार निवडलेल्या रोपवन क्षेत्रास देण्यात येणाऱ्या शास्त्रोक्त उपचाराबाबत तपशिल उपचार नकाशात दर्शविण्यात यावा. मात्र अनेकदा उपचार नकाशातच ग्रीड्स दर्शवुन त्यामध्येच ग्रीड क्रमांक दिले जातात. त्यामुळे